वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. १९ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३



# आसमान तेरी लहद पे शबनम अफशानी करे

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता



## मौलाना जफर मलीक साहाब नवे अमीर

बीड जिल्ह्याच्या तबलीग जमातचे अमीर (प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाब यांच्या निधनानंतर बीडचे नवे अमीर म्हणून मौलाना जफर मलीक सहाब यांची नियुक्ती झाली आहे. राज्य तबलीग जमातच्या निर्णयानंतर मौलाना जफर मलीक सहाब यांची नियुक्ती करण्यात आली.

## बीड जिल्हा तबलीग जमातचे प्रमुख सय्यद नजीब मौलाना साहाब यांच्या जनाजा नमाजसाठी अलोट गर्दी



बीड, (दिव्य न्युज):-बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर ( प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाब यांचे शनिवार दि.१८ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. आज रविवारी सकाळी ११.३० वाजता शहरातील बिंदुसरा नदी परिसरातील इजतेमा मैदानात त्यांची जनाजा नमाज अदा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे तबलीक जमातचे प्रमुख (अमीर सहाब) हाफीज मंजुर सहाब, मौलाना महेमुद सहाब, मौलाना लईक सहाब, मौलाना रईस सहाब, यांच्यासह राज्यातील अलिम, मुफ्ती, मौलाना आणि जिल्हाभरातून आलेले मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यानंतर मासूम कॉलनी मोमीनपुरा येथील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफन विधी

▶▶ पान २ वर

## बारामती-संगमनेर, शिर्डीसह राज्यात २१ नव्या जिल्ह्यांची होणार निर्मिती?

मुंबई, (दिव्य न्युज):- मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक मेसेज व्हायरल होत आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांचं विभाजन होऊन राज्यात २१ नव्या जिल्ह्यांची निर्मिती होणार असल्याचा दावा केला जातोय. २६ जानेवारी याबाबतची सरकारकडून घोषणा केली जाणार असल्याचं देखील व्हायरल मेसेजमध्ये दावा केला जातोय. या मेसेज सोबत कथित नव्या जिल्ह्याची यादी देखील देण्यात आली. हा मेसेज व्हायरल झाल्यानंतर महाराष्ट्रातील लोकांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहे.

सोशल मीडियावर अनेकांनी आपलं शहर जिल्हा होतोय, म्हणून अभिनंदन करायला सुरुवात केली आहे. तर काहींनी मूळ जिल्ह्याचं विभाजन नको म्हणत या निर्णयला विरोध करायला सुरुवात केलीय. मात्र या व्हायरल फोटोमागचं सत्य मात्र वेगळंच आहे. राज्यात नवीन २१ जिल्हे निर्माण करण्याचा सरकारने कोणताही निर्णय घेतला नाहीये. याबाबतचा कुठलाही प्रस्ताव सरकारकडे देण्यात आला नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे व्हायरल मेसेजमध्ये केला जाणारा दावा सपशेल खोटा असल्याचं समोर आलं आहे.

राज्यात २६ जानेवारी २०२५ रोजी नवीन जिल्ह्यांची घोषणा होणार आहे. राज्यातील ३५ पैकी अनेक जिल्ह्यांचं विभाजन होऊन नव्या २१ जिल्ह्यांची निर्मिती होणार असल्याचा दावा या पोस्टमध्ये केला जातोय. महत्त्वाची बाब म्हणजे सध्या राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत. मात्र व्हायरल मेसेजमध्ये ३५ जिल्हे असल्याचं म्हटलं आहे. तसेच भुसावळ, उदगीर, अंबाजोगाई, मालेगाव, कळवण, किनवट, मीरा भाईंदर, कल्याण, माणदेश, खामगाव, बारामती, पुसद, जव्हार, अचलपूर, साकोली, मंडणगड, महाड, शिर्डी, संगमनेर श्रीरामपूर आणि अहेरी हे नवे जिल्हे राज्यात निर्माण केलं जाणार असल्याचं व्हायरल मेसेजमध्ये म्हटलं आहे.

हा मेसेज व्हायरल झाल्यानंतर मंत्री राधाकृष्ण

▶▶ पान २ वर

## पोलीस भरतीचा सराव करणाऱ्या तिघा तरुणांना बसने चिरडले

### तिघे जागीच ठार, दोघे गंभीर, संतप्त जमावाची बसवर दगडफेक





घाटसावळी/बीड (दिव्य न्युज):- परळी-बीड महामार्गावर व्यायाम करणार्या युवकांना एसटी बसने चिरडलेल्या अपघातात तीन तरूण जागीच ठार झाले तर दोघे जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना आज पहाटे साडेसहा वाजण्याच्या सुमारास बीड-परळी महामार्गावरील जरूड फाट्याजवळ घडली. हे सर्व तरूण पोलीस भरतीची करत होते. अपघात घडल्यानंतर घटनास्थळी जमलेल्या संतप्त जमावाने एसटी बस जाळली. या अपघाताने घोडका राजुरी

▶▶ पान २ वर

### कसरत करणाऱ्या तरूणांना आवाहन

शारिरीक तंदुरूस्तीसाठी आणि खास करून पोलीस भरतीचा सराव करण्यासाठी बीड जिल्ह्यातले तरूण मोठ्या प्रमाणावर भल्या पहाटे कसरत करताना आणि सरावासाठी धावताना जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या महामार्गासह रस्त्यावर दिसून येतात. जिल्ह्यातले बहुतांशी महामार्ग हे वन वे झाले आहेत. ज्या गावच्या कडेवरून हा माहामार्ग गेला आहे खास करून तेथील तरूण महामार्गावर धावताना अथवा कसरत करताना हमखास दिसतात. सुरक्षेच्या दृष्टीने कुठल्याही उपाययोजना कसरत करणार्यांकडे नसतात तेव्हा तरूणांना जीव महत्वाचा आहे. आपण जेव्हा कसरत करतो तेव्हा पायातील बुट, पॅन्ट अथवा टी शर्टवर रिफ्लेक्टर्स लावावे आणि शक्यतो महामार्गावर कसरत न करता एखाद्या मैदानात कसरत करावी.

### मृत तरुणांच्या कुटुंबियांना १० लक्ष रूपयांची मदत जाहीर-आ.संदीप क्षीरसागर

बीड, (दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील पोलीस भरतीचा सराव करणार्या तीन तरूणांना एस.टी. बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. तसेच सदरील तरूण हे सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील असल्याने शासनाकडून त्यांच्या

▶▶ पान २ वर

## महाकुंभमेळ्यात भीषण आग! एकामागून एक सिलिंडरचे ब्लास्ट

### अनेक तंबू जळून खाक ;आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश



प्रयागराज, (वृत्तसेवा):- महाकुंभात भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. तंबूत ठेवलेले सिलिंडर सतत ब्लास्ट होत आहेत. या आगीत २० ते २५ तंबू जळाले आहेत. आखाड्यासमोरील रस्त्यावरील लोखंडी पुलाखाली ही आग लागली. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले आहे. आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रयागराज महाकुंभच्या सेक्टर १९ नगरमध्ये भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आहेत. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू आहे. महाकुंभात अनेक तंबूंना आग लागली. त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. आगीमुळे मंडपात ठेवलेले सामान जळून खाक झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या

पान २ वर




## वाल्मिक कराडला उद्या जामीन मिळणार?

### वकिलांची महत्त्वाची माहिती

बीड, (दिव्य न्युज):- वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर उद्या केज न्यायालयात सुनावणी होणार आहे. याच जामीनावर वाल्मिक कराडचे वकील अशोक कवडे यांनी याबाबत माहिती दिली आहे. वाल्मिक कराड १४ तारखेला न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर आम्ही त्याच दिवशी जामिनासाठी अर्ज केला होता. यावर सरकारी पक्ष आणि तपास अधिकाराचे उत्तर मागवले होते. आता याची सुनावणी उद्या होणार आहे. काल प्रकृती खराब असल्यामुळे मी न्यायालयात हजर राहू शकलो नाही. त्यामुळे उद्या सुनावणी होणार आहे. या गुन्ह्याशी माझा काही संबंध नाही, असं पक्षकाराचे म्हणणं आहे. या खंडणीच्या गुन्ह्यात आपल्याला गोवले गेले असेही ते म्हणाले आहेत, अशी प्रतिक्रिया वाल्मिक कराडचे वकील अशोक कवडे यांनी दिली.

संबंधित प्रकरण दाखल करायला झालेला उशीर हे दर्शवितं की, त्यांना या प्रकरणात गुंतवले गेले आहे.

▶▶ पान २ वर

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पर्व नवसंकल्प

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सर्वांनी तयार रहा-आ इंद्रीस नायकवडी



शिर्डी, (दिव्य न्युज):- नगर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्राचे दोन दिवसीय अजीत पर्व नवसंकल्प शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी चे राष्ट्रीय अध्यक्ष अजीतदादा पवार राष्ट्रवादी चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल. प्रदेशाध्यक्ष खा सुनिल तटकरे सह राज्याचे कॅबिनेट मंत्री व राज्यमंत्री,खासदार आमदार

राष्ट्रवादी काँग्रेस चे विविध विभागांचे आघाडी चे राज्य प्रमुख सह ३०० पदाधिकारी उपस्थितीत होते यावेळी अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आ इंद्रीस नायकवडी यांनी सांगितले की मिशन स्थानिक स्वराज्य निवडणुका असुन होणार्या महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज रहा विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी ला जनतेने मोठे यश दिले आहे.विधानसभेत ५९ पैकी ४१ जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार निवडून आले आहे यात सर्व समाजाने पक्षाला साथ दिले आहे.सर्व समाजाला सोबत घेऊन विकास काम राष्ट्रवादी काँग्रेस करणार आहे विशेषात अल्पसंख्याक समाजाकडे लक्ष दिले आहे.आम्ही शाहु फुले आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांशी बांधिली आहे. नवसंकल्प शिबीर २०२५ मध्ये पक्षाच्या सर्व विभागांच्या प्रदेशाध्यक्षांनी आगामी काळातील त्यांच्या विभागाच्या वाटचालीबद्दल आणि पक्षविस्ताराबददल विविध उपक्रमासंदर्थात आपली मतं व्यक्त केली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी ला लागा असे आवाहन आ इंद्रीस नायकवडी यांनी केले आहे

## जात प्रवर्गावरून वादंग, दहावी-बारावीच्या प्रवेशपत्रात नोंद केल्याने टीकेची झोड

# हॉलतिकिटात घुसवलेली जात हद्दपार

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या दहावी-बारावी परीक्षांच्या प्रवेशपत्रांवर (हॉलतिकिट) यंदा प्रथमच जातीच्या प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातीपातीच्या वादातून आधीच महाराष्ट्रात वातावरण तापलेले असताना बोर्डाच्या निर्णयावर टीकेची झोड उठली आहे.राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे, राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी मात्र विद्यार्थ्यांच्या हितासाठीच हा निर्णय घेतल्याचे सांगत समर्थन केले आहे. आम्ही जातीचा उल्लेख केला नसून फक्त प्रवर्गाची नोंद केल्याची मखलाशीही त्यांनी केली. पण, विद्यार्थ्यांच्या टीसीवर जातीची नोंद असताना मग पुन्हा हॉलतिकिटावर हा खटाटोप कशासाठी, असा सवाल पालक व शिक्षणतज्ज्ञ करत आहेत. त्यामुळे रात्री एक परिपत्रक काढून बोर्डाने हॉलतिकिटावरील प्रवर्ग नोंदी रद्द करून नव्याने हॉलतिकिट देणार असल्याचे जाहीर केले.

### जातीचा नाही, तर केवळ प्रवर्गाचा उल्लेख केला

जातीचा प्रवर्ग तेथे टाकावा. कुठल्याही जातीचा उल्लेख करायचा नाही. केवळ एससी, एसटी, ओबीसी असा प्रवर्ग असेल. भविष्यात विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा देण्यासाठी सोयीचे व्हावे, त्यांना विविध शिष्यवृत्ती अन् शुल्क माफीसह इतर योजनांचा लाभ देण्यासाठी डाटा शिक्षण विभागाकडे असावा हाच उद्देश आहे. त्यात कुठेही जातीचा उल्लेख करू नये, असेच आदेश मी राज्य शिक्षण मंडळाला दिले आहेत.

**- दादा भुसे, शालेय शिक्षणमंत्री**

### जिथे रोल नंबरवर स्टिकर तिथे प्रवर्ग तरी कशाला?

बोर्डाने हॉलतिकिटावर जात प्रवर्गाचा केलेला उल्लेख अत्यंत चुकीचा आहे. आपण परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांची ओळख लपवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. विद्यार्थ्यांची ओळख परीक्षकालाही कळू नये यासाठी रोल नंबरवरही आपण स्टिकर लावतो. त्यामुळे बोर्डाने हॉलतिकिटावर जात प्रवर्गाचा केलेला उल्लेख न पटणारा आहे. विशेषतः या निर्णयाखातर दिलेले स्पष्टीकरणही न पटणारे आहे. एकवेळ जातीचा उल्लेख निकालावर केला असता तर ते चालले असते, पण शाळेच्या दाखल्यावर जात असताना पुन्हा हॉलतिकिटावर त्याचा उल्लेख करणे योग्य नाही.

**- हेरंब कुलकर्णी, शिक्षणतज्ज्ञ.**

शाळेत कोणती जात नोंदवण्यात आलीय याची माहिती पालकांनाही व्हावी म्हणून हॉलतिकिटावर जातीचा उल्लेख केला. शालेय शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी गेला की प्रवर्गात बदल करता येत नाही. त्यामुळे जर शाळेतच चुकीची नोंद झाली असल्यास पालकांना योग्य ती कागदपत्रे सादर करून दुरुस्ती करता यावी हा या उल्लेखामागील हेतू आहे. त्यामुळे या निर्णयाचा वेगळा अर्थ काढू नये. - शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य शालेय शिक्षण मंडळ, पुणे

### बारावीचे नवे हॉलतिकीट २३ पासून, दहावीचे २० जानेवारीला मिळणार

दिवसभर आपल्या निर्णयाचे समर्थन करणाऱ्या राज्य शिक्षण मंडळाला सायंकाळी मात्र उपरती आली. राज्य शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांच्या सहीने एक पत्रक जारी करण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, 'बोर्डातर्फे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली जात प्रवर्गाचा उल्लेख असलेली प्रवेशपत्रे (हॉलतिकीट) रद्द करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांना आता २३ जानेवारीपासून नव्याने तयार केलेली हॉलतिकिटे राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेण्यासाठी दिली जाणार आहेत. तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विभागीय मंडळातर्फे उपलब्ध करून देण्यात आलेली प्रवेशपत्रे जात प्रवर्गाचा उल्लेख असल्यामुळे तीसुद्धा रद्द केली आहेत. विद्यार्थ्यांना ही प्रवेशपत्रे राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून २० जानेवारी रोजी दुपारी तीन वाजेपासून डाऊनलोड करून घेता येतील, असे बोर्डातर्फे जाहीर करण्यात आले आहे.

# मंत्रिपद मिळालं नाही म्हणून ३ वर्षे पुण्याला जावून बसता

## शरद पवार गटाच्या नेत्याचा तानाजी सावंतांवर गंभीर आरोप

मुंबई, (दिव्य न्युज):- तुम्हाला लोकांनी काम करण्यासाठी निवडून दिलं, पण महाविकास आघाडी सरकारच्या काळात तुम्हांला मंत्रिपद मिळालं नाही, म्हणून तुम्ही तीन वर्षे पुण्याला जाऊन बसलात, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आणि माजी आमदार राहुल मोटे यांनी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्यावर निशाणा साधला आहे.

राष्ट्रवादी (शरद पवार) काँग्रेसची शिवस्वराज्य यात्रा परांडा शहरात आली होती. त्यावेळी राहुल मोटे यांनी सावंत यांच्या कार्यपद्धीवर टीका करत त्यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले. शिवस्वराज्य यात्रेदरम्यान बोलताना मोटे म्हणाले, आरोग्य खात्याचं मंत्रीपद तानाजी सावंतांकडे आहे.

पण तुम्ही आजारी पडल्यानंतर आपण केलेल्या रुग्णालयात उपचार घेता की, तानाजी सावंतांनी केलेल्या रुग्णालयात उपचार घेता? त्यांचा दवाखाना तुम्ही बघितला तरी आहे का? प्रत्येक वेळेस आल्यानंतर १०० खाटांचा दवाखाना केला, असं ते सांगतात. मात्र, ते सर्व दवाखाने केवळ कागदावर आहेत. तुम्हाला जनतेने पाच वर्षांची संधी दिली होती. मात्र, तुम्ही त्या संधीचा फायदा घेतला नाही.

तुम्हाला लोकांना काम करण्यासाठी निवडून दिलं होतं. पण मंत्रीपद मिळालं नाही म्हणून तुम्ही तीन वर्षे पुण्याला (झींपश) जाऊन रुसून बसलात. कोरोना काळात मी मतदारसंघात असायचो पण ते पुण्याला जाऊन बसायचे. यावेळी त्यांनी सावंत यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले, ६ हजार कोटींचा अँम्बुलन्स घोटाळा, आरोग्य खात्याचा दोन हजार कोटींचा घोटाळा आणि कंत्राटी कामगारांमध्ये आणि पंढरपूरमध्ये वारकऱ्यांच्या तपासणीच्या नावावर घोटाळा केला.

देवाच्या नावावर पैसे खाणाऱ्या माणसावरही आपण बोलूच. तानाजी सावंतांना खालच्या पातळीवर टीका करण्याची सवय आहे, मात्र, आपल्यावर ते संस्कार नाहीत, असंही मोटे यावेळी म्हणाले. तरुणांना आणि सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन राजकारण केल्यामुळे मी तीन वेळा निवडून आलो.

शिराळा उपसा सिंचन पूर्ण केला शिवाय १० ते १५ स्टोरेज टँक माझ्या कार्यकाळात पूर्ण केले. शासकीय इमारतींचे देखील काम केलं. पण या पाच वर्षांत मतदारसंघात एकतरी नवीन पाझर तलाव, स्टोरेज टँक प्रशासकीय इमारत झाली का? असा प्रश्न देखील मोटे यांनी यावेळी उपस्थित केला.

# वाल्मिक कराडचा पाय खोलात उज्ज्वल निकम यांची एन्ट्री?

## काल रात्री सागर बंगल्यावर नेमकं काय झालं?

मुंबई, (दिव्य न्युज):- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आरोपी वाल्मिक कराड याच्यावर मोक्का अंतगर्त कारवाई करण्यात आली आहे. एकीकडे वाल्मिक कराड अधिक गोत्यात सापडत असताना आता धनंजय मुंडे यांच्या अडचणी देखील वाढत असल्याचं पहायला मिळतंय. वाल्मिक कराडविरुद्ध उज्ज्वल निकम यांच्याकडे वकीलपत्र द्यावी, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली होती. अशातच आता मोठी माहिती समोर आली आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. काल रात्री सागर बंगल्यावर निकम यांनी फडणवीसांची भेट घेतली. मात्र, भेटीतील तपशील अद्याप गुलदस्त्यात असल्याची माहिती मिळाली आहे. बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणी उज्ज्वल निकम यांच्याकडे वकीलपत्र द्या, अशी मागणी करण्यात आली होती. भाजप आमदार सुरेश धस आणि देशमुख कुटुंबाने ही मागणी केली होती. अशातच उज्ज्वल निकम बीडचा खटला स्वीकारणार का ? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

उज्ज्वल निकम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतील, अशी माहिती काल सुरेश धस यांनी दिली होती. दाओसला जाण्याआधी मुख्यमंत्री उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करतील, असं सुरेश धस यांनी सांगितलं होतं. अशातच आता सागर बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उज्ज्वल निकम यांची १० मिनिट चर्चा झाल्याने आता वाल्मिक कराडच्या अडचणी अधिकच वाढण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या प्रकरणी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, जयराम चाटे, महेश केदार, विष्णू चाटे, प्रतीक घुले आणि सिद्धार्थ सोनवणे यांना अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. कृष्णा आंधळे हा अद्यापही फरार आहे. त्यामुळे आता या प्रकरणात नेमकं काय काय होतं? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

पोलिसांनी वाल्मीक कराडचे जे तीन मोबाईल जप्त केले होते. त्यातील काही सीमकार्ड अमेरिकेत रजिस्टर करण्यात आल्याचं समोर आलं आहे. वाल्मीकने हे फोन कुणाला केले? कशासाठी केले? याची माहिती अद्याप समोर आली नाही. मात्र त्याचे सीमकार्ड अमेरिकेत रजिस्टर असल्याने या प्रकरणात नवा ट्वीस्ट आल्याचं बघायला मिळत आहे.

पान ४ वरून

### अजित पवारांना पक्षातून

शपथ घ्यायला जाऊ नका, हे मोठं षडयंत्र आहे. तुमच्या पाया पडतो पण तुम्ही जाऊ नका, असं मी दादांना म्हणालो होतो. पण दादांनी माझं ऐकलं नाही. काहीही होणार नाही, असं म्हणत ते शपथविधीला गेले. याला सुनील तटकरे स्वत: साक्षीदार आहेत. तेव्हापासून दादांना पक्षातून बाजुला करण्यासाठी षडयंत्र सुरू होतं, असा गौप्यस्फोट धनंजय मुंडे यांनी केला आहे. दरम्यान, मुंडे यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणावर देखील भाष्य केलं. सरपंच देशमुख यांची निर्घृण हत्या झाली आहे. ज्यांनी हे कृत्य केलंय, त्याला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणीही मुंडेंनी यावेळी केली. शिवाय मैं आएना हू, मैं आएना दिखाऊंगा, अशा शब्दांत धनंजय मुंडे यांनी विरोधकांना इशारा दिला आहे.

### धनंजय मुंडेंचं खळबळजनक

बदनाम केलं जातंय. आम्ही हात जोडून विनंती केली. माझ्या वैयक्तिक विषयात पक्ष माझ्यामागे उभा राहिला. माझ्या देहावरील अग्नीचा धूर देखील त्याची परतफेड करु शकत नाही. जेव्हा गरज पडली तेव्हा आम्ही तुमच्यासाठी शत्रूंना शिंगावर घेण्यात मागे हटलो नाही. टीका करायचीच ठरलं तर माझ्यासारखा टीकाकार कोणी होऊ शकत नाही. आपल्याला नव संकल्प करायचा असेल तर कार्यकर्त्यावर तेवढा विश्वास ठेवला पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

मी अजितदादांना सांगत होतो भाजपसोबत जाऊ नका

२३ नोव्हेंबर २०१९ रोजी पहाटेचा शपथविधी पार पडला होता. अजित पवार यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून आणि देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. या घटनेवरून धनंजय मुंडे म्हणाले की, पहाटेच्या शपथविधीच्या वेळी मी अजितदादांना सांगत होतो की, तुम्ही भाजपसोबत जाऊ नका, हे षडयंत्र आहे. पाया पडलो पण दादा म्हणाले, काही होत नाही. सुनील तटकरे त्याला साक्षीदार आहेत. तेव्हापासून अजितदादांना पक्षातून दूर करण्यासाठी षडयंत्र सुरु झालं, असे त्यांनी म्हटले आहे.

बीडच्या पालकमंत्रिपदाबाबत मीच दादांना विनंती केली : धनंजय मुंडे

दरम्यान, पालकमंत्रीपदावरून धनंजय मुंडे यांचा पत्ता कट करण्यात आला. याबाबत माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडे यांनी मोठं वक्तव्य केलंय. त्यांनी म्हटलंय की, एकंदर सद्यस्थिती पाहता, मी स्वत: अजितदादांना आणि मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. बीडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी दादांनी द्यावी. पुण्याचा जसा विकास झाला तसा दादांकडे उपमुख्यमंत्रिपद असल्यामुळे बीडचाही विकास होईल. बीडची आता जी परिस्थिती आहे, त्यात आपण ही जबाबदारी घेतली नाही पाहिजे. दादांकडे द्यायला पाहिजे. सद्यपरिस्थितीत काय निर्णय घ्यायला पाहिजे हे लक्षात घेऊन मी पक्षाला विनंती केली की जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी दादांना द्यावी, असे त्यांनी म्हटले.

### सह्याद्री मराठी पत्रकार

भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या विकासात्मक कार्यासाठी तसेच समाजहितासाठी कायम कटिबध्द राहिलेला आहे संघाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य तसेच सामाजिक जनजागृती संघ अविरत करत असुन संघाने पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी सदैव आवाज उठलेला आहे तसेच पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा निर्धार करत येणाऱ्या काळात केज तालुक्यात सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे काम तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करणार असल्याचे नवनिर्वाचित पदाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले व सर्व पदाधिकारी यांना निवडीनंतर पुढील वाटचालीसाठी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच मित्र सहकारी यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या व सर्वांच्या सहकार्याने सह्याद्री मराठी पत्रकार संघाची केज तालुका कार्यकारिणी निवड संपन्न झाली.

### सैफवरील हल्ल्याला वेगळे

सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीचे नाव मोहम्मद शहजाद असून तो बांगलादेशी घुसखोर असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. याच मुद्यावरून राज्याच्या राजकारणात बांगलादेशी घुसखोरांचा प्रश्न चर्चेत आला आहे. यावरून आदित्य ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना सवाल करत टीका केली होती. त्यानंतर आता रोहित पवार यांनीही पुण्यामधील एका कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना या प्रकरणावर भाष्य करत सरकारवर निशाणा साधला आहे.

सैफ अली खानचा विषय भलतीकडे वळवू नका. हल्लेखोराला पकडण्यात आले आहे. त्यातून समोर येईलच. मात्र बाबा सिद्दीकी यांच्याबाबतीत पण तसंच झाले. सिद्दीकींचा मुलगा त्यांच्या वडिलांचा खून करणारे आरोपी वेगळेच आहेत, यामध्ये बिल्डर लॉबीचा हात असू शकतो, असे सांगत असले तरी त्याच्या कडे सरकार लक्ष देत नाही. तसेच सैफ अली खानच्या बाबतीत देखील. हे प्रकरण दुसरीकडे नेण्याच्या प्रयत्न करण्यात येत आहे, असा दावा रोहित पवारांनी केला.

पान १ वरून

### बीड जिल्हा तबलीग

करण्यात आला.

बीड शहरातील राजुरी वेस येथील मरकज मस्जीद येथून त्यांचा जनाजा काढण्यात आला. राजुरी वेस , बशीर गंज चौक, जुने एसपी ऑफिस समोरील रोड, खासबाग रोड मार्गे जनाजा इजतेमा मैदान येथे दाखल झाला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या मुस्लिम समाज बांधवांनी जनाचा नमाज अदा केली. बीड शहरातील मर्कज मस्जिद समोरील कारंजा भागातील रहिवासी असलेले सय्यद नजीब सय्यद मासूम सहाब ( अमीर सहाब ) हे गेल्या काही वर्षांपासून आजारी होते. त्यांच्यावर बीड शहरातील काकू नाना हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. शनिवारी रात्री त्यांची प्राणजोत मालवली. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांच्या होते. त्यांच्या पश्चात पत्नी , एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. सय्यद अमिर सहाब यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सायं.दै.दिव्य वार्ता परिवार सहभागी आहे.

### गावावर शोककळा पसरली आहे.

याबाबत असे की, पोलीस होण्याचं स्वप्न उराशी बाळगत बीड जिल्ह्यातले अनेक तरूण भल्या पहाटे रस्त्यावर धावण्याचा सराव करताना अनेकदा दिसून येतात. बीड -परळी महामार्गावरील जरूड येथील पाच तरूण आज भल्या पहाटे राजुरी फाट्यावर व्यायाम करत होते. त्यावेळी बीडकडून बस क्रमांक एम.एच.१४ बी.टी.१४७३ ही बीड-परभणी एसटी बस परभणीकडे निघाली होती. सदरची बस ही राजुरी फाट्यानजिक आली. तेव्हा रस्त्यावर व्यायाम करणार्या सुबोध उर्फ बालू, बाबासाहेब मोरे (२०), विराट बब्रुवान घोडके (१९), ओम सुग्रीव घोडके (२०), आदित्य बळीराम डरफे, आदित्य लक्ष्मण घोडके या पाच तरूणांना बसने चिरडले. यामध्ये सुबोध मोरे, विराट घोडके, ओम घोडके हे तिघे जागीच ठार झाले. तर अन्य दोघांचे दैव बलवत्तर त्यांनी तात्काळ उड्या मारल्याने ते बचावले. यात दोन्ही आदित्य नावाचे तरूण गंभीर जखमी झाले आहेत. अपघात एवढा भीषण होता की ज्या स्थितीमध्ये हे तरूण चिरडले गेले. त्या स्थितीमध्ये रक्तामासांचा शिंतोडे रस्त्यावर दिसून येत होते. अपघाताची माहिती वार्यासारखी गावात पसरली. तेव्हा गावकर्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. तत्पूर्वी अपघात झाल्यानंतर चालकाने बस वळवून आणून ती रस्त्याच्या बाजूला उभी केली. संतापलेल्या जमावाने एसटी बस पेटवून दिली. या जखमींना तात्काळ बीडच्या रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तर शवविच्छेदनानंतर तिघांचे मृतदेह नातेवाईकांच्या हवाली केले. घोडका राजुरी येथील गावकर्यांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे. संतप्त जमावाने बसवर दगडफेक करत तिला पेटवून दिल्यानंतर या महामार्गावरील बससेवा पूर्णत: बंद करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

### मृत तरुणांच्या कुटुंबियांना

कुटुंबीयांना मदत व्हावी अशी मागणीही घोडका राजुरी ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक व मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रत्येकी १० लक्ष रूपये इतकी मदत कुटुंबियांना जाहीर केली आहे.

घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करणारे ५ तरूण नेहमी प्रमाणे रविवारी (दि.५) रोजी सकाळी सराव करत असताना अचानक एस.टी. महामंडळाची बीड येथून परभणीकडे निघालेल्या बसने व्यायाम करत असणार्या या तरुणांना चिरडले त्यापैकी २ तरूणांनी बचावात उडी मारल्याने ते जखमी झाले परंतु त्यातील ३ तरूण सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (वय १९), ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे जागीच ठार झाले. पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणारे हे युवक अत्यंत सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील होते. त्यामुळे घोडा राजुरी येथील ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक यांनी मृतांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना या घटनेची माहिती देऊन या अपघातातील मृत झालेल्या तरूणांच्या कुटुंबियांना मदतीची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मृत्यू झालेल्या तीन्ही तरूणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लक्ष रूपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून मी या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी तर आहेच परंतु या कुटुंबियांच्या घरातील सदस्य म्हणून मी यापुढे त्यांच्या सुखःदुखात कायम असेल. तसेच शासनाने जाहीर केलेली मदत कुटुंबियांना मिळेपर्यंत पाठपुरावा करणार आहे यासोबतच ग्रामस्थ व नातेवाईक यांच्या मागणीनुसार कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबातही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

### महाकुंभमेळ्यात भीषण

अनेक गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आगीमुळे काळ्या धुराचे लोट संपूर्ण जत्रा परिसरात दिसत होते. ही घटना तुलसी मार्ग सेक्टर १९ येथील असल्याचे सांगण्यात आले. अग्निशमन दलाचे कर्मचारी लोकांना बाहेर काढत आहेत. आग पसरू नये म्हणून जवळपासच्या तंबूत राहणाऱ्या लोकांना बाहेर काढण्यात आले आहे. डझनभर झोपड्या जळून खाक झाल्याचं बोललं जात आहे. वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले आहेत.

गीता प्रेस गोरखपूरच्या शिबिरावरही परिणाम झाला आहे. आगीवर अद्याप नियंत्रण मिळालेले नाही. आग अजूनही सतत धुमसत आहे. घटनास्थळी डझनहून अधिक रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल आहेत. आगीचे कारण समजू शकले नाही. सर्व वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत. आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

### बारामती-संगमनेर,

विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या माहितीनुसार राज्य सरकारसमोर नगरसह राज्यातील कोणत्याच जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रस्ताव नाही. अहिल्यानगर जिल्हा विभाजनाचा प्रश्नच येत नाही. मी महसूल मंत्री असताना जिल्हा विभाजनाचा कोणताही प्रस्ताव माझ्यासमोर आला नव्हता. जिल्हा विभाजनाच्या बातम्या कोण उडवतात, हेच कळत नाही, अशी प्रतिक्रिया भाजपचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

### वाल्मिक कराडला

खंडणी मागितली आणि खंडणी दिली, खंडणी मागितली किंवा दिली यातील कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याचे दिसून येत आहे. आमची बाजू बघून न्यायालयाने आम्हाला जामीन द्यावा ही मागणी आम्ही उद्या न्यायालयात करणार आहोत. आमच्या पक्षकाराचा न्यायालयावर विश्वास आहे, असं वकील अशोक कवडे म्हणाले.

वाल्मिक कराड यांच्यावर असलेल्या गुन्ह्याच्या ज्या बातम्या प्रकाशित झाल्या त्यानंतर पक्षकाराने संबंधित तपास अधिकारी यांच्याकडे यादी दिली आहे. यात त्यांच्यावर १४ गुन्हे दाखल होते. यापैकी ११ ते १२ गुन्ह्यातून ते दोष मुक्त झाले आहेत. बाकीचे गुन्हे राजकीय आंदोलनातील संदर्भातले आहेत. कराड यांचे अमेरिकेशी संबंध आहेत का नाही? याबाबत न्यायालयासमोर कुठलाही भाग आलेला नाही. तपास अधिकारी योग्य ते खुलासा करू शकतील, असंही वाल्मिक कराडचे वकील अशोक कवडे म्हणाले.

दरम्यान, बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांच्या कुटुंबियांकडून आणि त्यांच्या समर्थकांकडून करण्यात आली आहे. या प्रकरणात सीआयडीचा तपास सुरु आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची स्थापना केली आहेत. तसेच न्यायालयीन समितीची देखील स्थापना केली आहे. संतोष देशमुख यांची हत्या प्रकरण, खंडणी प्रकरण आणि या प्रकरणांशी संबंधित विविध प्रकरणावर सध्या तपास सुरु आहे. तपासातून काय-काय माहिती समोर येते ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.